## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail:- dg@barti.in


**महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील मांग, मांतग, मिनिमादिगा, दखनी-मांग,मांग-म्हशी , मदारी, गारूडी, राधे मांग, मांग-गारोडी , मांग - गारूडी समाजातील युवक-युवतींसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इ.मध्ये लिपिक वर्गीय स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी मोफत निवासी प्रशिक्षण कार्यक्रम**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील मांग,मातंग,मांग-गारुडी इतर तत्सम संवर्गातील **१५० विद्यार्थ्यांना आय.बी.पी.एस., एल.आय.सी., रेल्वे, बँक लिपीक व त्या समकक्ष पदाच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी नि:शुल्क आणि निवासी** प्रशिक्षणाकरीता **हितोपदेशक बहुउद्देशीय संस्था, अकोला** प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून **अकोला** या ठिकाणी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

| अनु. क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव | एकूण जागा |
|---|---|---|
| १. | हितोपदेशक बहुउद्देशीय संस्था, अकोला | १५० |

**पात्रता :**

१) महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील मांग,मातंग,मांग-गारुडी इतर तत्सम संवर्गातील असावा.
२) अर्जदाराचे वय १८ ते ३४ पर्यन्त असावे.
३) अर्जदार किमान १२ वी उतीर्ण असावा.
४) उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
५) निवड केलेल्या उमेदवारांची प्रशिक्षणा दरम्यान निवासाचा व भोजनाच्या खर्चासाठी शासन निर्णयानुसार बार्टी कडून वर नमूद संबंधित संस्थेला निधी देण्यात येईल व उमेदवारासाठी नि:शुल्क निवास व भोजन व्यवस्था वर नमूद संस्थेमार्फत करण्यात येईल.
६) उमेदवारांना बार्टी मार्फत लिपीक स्पर्धा परिक्षा तयारीसाठी रु.५०००/- किंमतीचे पुस्तकांचा संच देण्यात येईल.
७) दिव्यांग असल्यास ४०% पेक्षा जास्त प्रमाणात असलेल्या दिव्यांगत्वाचा दाखला सांक्षाकित प्रत

**विद्यार्थी निवडीचे निकष :**

- प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने गुणवत्ता यादीतील रु.८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेल्या सर्व पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**आरक्षण :**

- ३० % जागा महिलांसाठी राखीव
- ४ % जागा दिव्यांगाकरीता राखीव

**चाळणी परीक्षेचे स्वरूप :**

- संबंधित पूर्व प्रशिक्षण आय.बी.पी.एस., एल.आय.सी., रेल्वे, बँक लिपीक व त्या समकक्ष पदाच्या परीक्षेच्या धर्तीवर असेल.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :**

- **ऑनलाईन नोंदणी करण्याची शेवटची तारीख २६/१०/२०२३**
- प्रशिक्षण कालावधी – ६ महिने (निवासी)
- प्रशिक्षण कालावधी मध्ये विद्यार्थ्यांच्या निवास, चहा,नाश्ता व जेवणाची सोय प्रशिक्षण केंद्रात केली जाईल.
- सदर योजनेबाबत/ प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच/प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार मा. महासंचालक, बार्टी व शासनास राहतील.
- प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.
- ज्या उमेदवरांनी यापूर्वी बार्टी, पुणे मार्फत (MPSC) महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, UPSC नागरी सेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण आणि बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांचे यापूर्वी प्रशिक्षण घेतले असेल त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार नाही.

- इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि.११/१०/२०२३ पासून **https://docs.google.com/forms/d/1TcOTpHbX6xSpn1kxMZxxJIH6f4czUyQuR98X9GEhAwk/edit** या लिंकवर ऑनलाईन अर्जाची नोंदणी करावी.

Sunil Ware 11/10/23

**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**